**खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागास वर्ग विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्तीसंदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती..**

**महाराष्ट्र शासन,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. टिईएम २००७/(४९६/०७)/तांशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १० डिसेंबर, २००७.

**प्रस्तावना** : राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि विभाग, इत्यादी विभागांच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या अनुदानित, खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयात सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्याबाबतच्या धोरणास राज्य मंत्रीमंडळाने दिनांक १२.९.२००७ च्या बैठकीत मान्यता दिलेली असून त्यानुसार याबाबत आवश्यक ते शासन आदेश संबंधित प्रशासनिक विभागाकडून निर्गमित करण्याची कार्यवाही अपेक्षित आहे. या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने या संदर्भात आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना फी प्रतिपूर्तीचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक ते शासन आदेश दिनांक २ नोव्हेंबर, २००७ रोजी निर्गमित केलेले आहेत. सदरहू योजना सन २००६-०७ या वर्षापासून लागू केलेली आहे. तथापि, या योजनांतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांना याचा पूर्णत: लाभ मिळून योजनेचा सामाजिक उद्देश सफल व्हावा, या उद्देशाने योग्य ती कार्यपध्दती निश्चित करावयाची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय** : राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालय / तंत्रनिकेतन मध्ये सन २००६-०७ व २००७-०८ या शैक्षणिक वर्षात केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयाद्वारे प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

कार्यपध्दती :

(१) राज्यातील अभियांत्रिकी औषधनिर्माणशास्त्र, एच.एम.सी.टी., वास्तूशास्त्र, इत्यादी अभ्यासक्रमांतील पदविका आणि पदवीमधील विद्यार्थी तसेच एम.बी.ए. आणि एम.सी.ए.मधील विद्यार्थ्यांनी खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयात आर्थिक मागास

प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयाद्वारे प्रवेश घेताना इतर शैक्षणिक कागदपत्रांबरोबर आर्थिक मागास प्रवर्गाचे सक्षम अधिकाऱ्याचे योग्य ते प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन त्याची खातरजमा संबंधित संस्थेने करणे आवश्यक आहे.

(२) तद्नंतर संस्थेने आर्थिक मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची यादी तयार करुन त्यांना त्यांच्या प्रवेशापोटी किती प्रवेश शुल्काची शासनाने प्रतिपूर्ती करावयाची आहे, हे निश्चित करणे आवश्यक आहे.

(३) वरील कमप्रमाणे योग्य ती कारवाई करुन संबंधित संस्था या योजनेपोटी संस्था स्तरावर किती निधीची आवश्यकता आहे, याची विद्यार्थीनिहाय आकडेवारी/सांख्यिकी माहिती संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण यांना सादर करावी.

(४) संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण यांनी आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील/कार्यक्षेत्रातील शैक्षणिक संस्थांची यादी, विद्यार्थ्यांची संख्या, फी प्रतिपूर्तीसाठी येणारा खर्च, इत्यादी बाबी तपासून त्यांना या योजनेसाठी किती निधी लागणार आहे, हे निश्चित करुन याबाबतची निधीची मागणी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे नोंदवावी.

(५) संचालक, तंत्र शिक्षण यांनी संपूर्ण राज्यातील खाजगी, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्था यांची यादी, विद्यार्थी संख्या व त्यासाठी लागणारा निधी यांची परिगणना करुन आवश्यक तेवढा निधी संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडे वितरित करावा.

(६) संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण यांनी सदर निधी संबंधित शैक्षणिक संस्थेकडे मागणीनुसार प्रमाणात वितरित करावा.

(७) संबंधित शैक्षणिक संस्थांनी सदरहू निधी प्राप्त झाल्यानंतर या निधीचे लाभार्थी विद्यार्थ्यांना वाटप करुन त्याबाबतचे फी प्रतिपूर्तीचा लाभ मिळाल्याचे संबंधित विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र संस्थेने घ्यावे. तद्नंतर उपयोगिता प्रमाणपत्र व लाभार्थी विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र १५ दिवसांच्या आत संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण यांना सादर करावे.

(८) सदर उपयोगिता प्रमाणपत्र तपासून विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण यांनी स्वयंस्पष्ट अहवाल प्रमाणपत्र प्रतीसह संचालक, तंत्र शिक्षण यांना १५ दिवसांत सादर करावा.

(९) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण राज्यात या निधीचे झालेल्या विनियोगाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास १५ दिवसांत सादर करावे.

(१०) संबंधित शैक्षणिक संस्थांनी सदर निधी त्यांना विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर या निधीचे वाटप १५ दिवसांच्या आत लाभार्थी विद्यार्थ्यांना करणे क्रमप्राप्त असून निधीचा विनियोग प्रस्तावित कारणांसाठीच करण्यात आला, असे उपयोगिता प्रमाणपत्र सादर

करावे. अन्यथा, एकूण देय रकमेच्या प्रतिदिनी १ टक्केप्रमाणे दंड वसूल करण्याची कारवाई सदर संस्थावर संचालक, तंत्र शिक्षण यांच्या स्तरावरुन करण्यात येईल. दंडनीय रकमेच्या संदर्भात काही वाद उद्भवल्यास शासनाचा निर्णय अंतिम राहील.

(११) निधी विनियोगासंदर्भात विद्यार्थ्यांकडून किंवा पालकांकडून काही तक्रार प्राप्त झाल्यास संचालकांनी त्याचे निराकरण करावे. तथापि, अशा वादाच्या मुद्यांवर शासनाच्या स्तरावरील निर्णय अंतिम असेल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००७१२१२११९५६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(कीर्तिलाल डमांप)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
प्रधान सचिव, कृषि विभाग
प्रधान सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग
प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग
प्रधान सचिव, नियोजन विभाग
प्रधान सचिव, वित्त विभाग
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
मा. मंत्री, ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये आणि उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
मा. मंत्री, कृषि विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
मा. मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
मा. मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
मा. मंत्री, सामाजिक न्याय विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
मा. मंत्री, वित्त व नियोजन विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती/तांशि-२

---

C:\DOCUM Babu\Reimbursement of fee.doc
H-1928 -2.

खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक टीईएम २०११/(प्र.क्र. ५३/११)/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ८ नोव्हेंबर, २०११

प्रस्तावना : शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि विभाग व पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यविकास विभाग या विभागाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या अभ्यासक्रमांच्या खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित संस्थामध्ये प्रवेश घेणाऱ्या सामाजिक मागास व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी केवळ निधीअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नये म्हणून एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्त्व म्हणून राज्य शासनाने फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून घेतलेला आहे. सदरहू निर्णय शैक्षणिक वर्ष २००७-०८,२००८-०९,२००९-१० व २०१०-११ मध्ये कायम ठेवण्यात आलेला आहे. आता सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०११-१२ व त्यापुढील कालावधीसाठी चालू ठेवण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने दिनांक १२.११.२०११ रोजी घेतला आहे. या निर्णयानुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती ,भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या समाज घटकांतील विद्यार्थ्यांची फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचे आदेश सामाजिक न्याय विभागामार्फत आणि अनुसूचित जमाती या घटकातील विद्यार्थ्यांसाठी फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचा आदेश आदिवासी विकास विभागाकडून तसेच आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या फी प्रतिपूर्तीचे आदेश त्या त्या प्रशासकीय विभागामार्फत निर्गमीत करणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०११-१२ करिता व त्यापुढील कालावधीसाठी योजना पुढे चालू ठेवण्याचे आदेश निर्गमीत करावयाची बाब या विभागाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

शासन निर्णय :- राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेली शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०११-१२ या वर्षासाठी राबविण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

(१) खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थामध्ये पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास वर्गासाठी सन २००६-०७, २००७-०८,२००८-०९,२००९-१०, २०१०-११ आणि या शैक्षणिक वर्षासाठी राबविण्यात आलेली योजना सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षात तसेच त्यापुढील कालावधीसाठी लागू राहील.

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एच.एम.सी.टी. | एच.एम.सी.टी. | -- |
| -- | वास्तूशास्त्र | -- |

(२) सदरहू योजनेचा लाभ घेण्यासाठी आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रु. १ लक्ष रकमेच्या आत असणे आवश्यक राहील.

(३) आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना ५० % शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येईल.

(४) सदरहू योजनेचा लाभ शैक्षणिक वर्ष २००६-०७,२००७-०८,२००८-०९,२००९-१० आणि २०१०-११ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांच्या पूर्ण कालावधीपर्यंत लागू राहील.

(५) तंत्र शिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी या योजनेचा लाभ ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारा (CAP) प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना लागू राहील.

(६) थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी जर केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतलेला असेल तर अशा विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील.

(७) अभिमत विद्यापीठांना ही सवलत लागू राहणार नाही.

(८) अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना ही सवलत लागू राहणार नाही.

(९) शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीचे सदर धोरण हे सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाकरिता कालावधीसाठी लागू राहील.

(१०) आर्थिक मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र हे संबंधित तहसिलदार यांचे असावे.

(११) आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांबाबत सदर योजना चालू ठेवण्यासाठी या विभागाकडून आवश्यक रकमेची तरतूद करण्यात येईल.

(१२) तंत्र शिक्षणाशी निगडीत वरील मुद्दा क्रमांक १ येथील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचा खर्च, मुख्य लेखाशिर्ष २२०३- तंत्र शिक्षण, १०७-शिष्यवृत्त्या, (००)(०६) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे रु. १.०० लाखापेक्षा अधिक नाही, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना ५० % फी माफी ( २२०३ ०७४८) या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकून आर्थिक वर्ष २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०११११०९१२०००३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भ. सं. यानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव, मुंबई
मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्याचे सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ३२
संचालक, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास (सर्व)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई /नागपूर
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व संबंधित मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक
कुलगुरु, सर्व विद्यापीठे

Accounts Officer
Directorate ... Education
Maha... 400 001